# दिनांक 22/04/2025

**1.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 20/04/2025 रोजी 23:30 वा च्या सुमारास मौजे- सिताई हॉटेलच्या समोर कर्जत खोपोली रोडवर भिसेगाव कर्जत येथे फिर्यादी रा.पुष्प कलश सोसायटी रुम नं 302,सुकापुर नवीन पनवेल व त्यांचे मित्र असे त्यांची इर्टिगा कार क्र एम एच 46 सीआर 6832 हिने कर्जत बाजुकडून खोपोली बाजुकडे जात असताना सिताई हॉटेल समोर आलेवेळी क्रेटा कार क्र एम एच 05 एफयु 7891 मधील चार अनोळखी इसमानी शिवीगाळी करुन त्यांचे हातातील प्लॅस्टीक स्टिक व दगडाने फिर्यादी यांचे गाडीचे काचा फोडून नुकसान केले तसेच त्यांचेपैकी पांढ-या रंगाचा शर्ट घातलेल्या इसमाने फिर्यादी यांचे डोळयावर व पोटावर हाताने व पायाने मारहाण केली तसेच फिर्यादी यांचे मित्र यांना त्यांचेपैकी ब्राउन रंगाचा शर्ट घातलेल्या इसमाने त्याचे हातातील प्लॅस्टीकच्या स्टिकने त्यांचे डावे हातावर मारून दुखापत केली व निळसर रंगाचा कुर्ता घातलेल्या इसमांने देखील हाताबुक्यांनी मारहाण केली व फिर्यादी यांचे मित्र यांना काळया रगांचा शर्ट घातलेल्या इसमाने हाताबुक्यांनी मारहाण केली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.107/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118(1),352,324(2),3(5).प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/शरद रोकडे हे करीत आहेत.

**2.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 21/04/2025 रोजी 00:30 वा च्या सुमारास मौजे पुणे- मुंबई एक्सप्रेस हायवेवर कि.मी.नंबर 39/00 जवळ खोपोली एक्झीटवर येथे आरोपीत रा.शिवरवाडी, ता.शिराळा, जि.सांगली याने त्याच्या ताब्यातील ट्रक क्र.ग्क्त-50-ग्-3103 हा अतिवेगाने, हायगईने, अविचाराने चालवुन रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवुन कार क्र.ग्क्त-43-क्क-1928 व ट्रक क्रं. -च्र्च्-05-छक़-7888 यांना ठोकर मारून अपघात करून अपघातात तिनही वाहनांच्या नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.108/2025, भारतीय न्याय संहिता कायदा 2023 चे कलम 281 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/अमोल धायगुडे हे करीत आहेत.

**3.** पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/01/2013 रोजी 00:00 वा ते दि. 16/04/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान आरोपीत यांना महिला फिर्यादी ह्या हिंदु बुरुड जातीची आहे हे माहित असताना त्याने सन 2010 मध्ये फिर्यादीशी प्रेमाचे नाटक करुन फिर्यादी ह्या खालच्या जातीची असल्याने लग्नास नकार देवुन फिर्यादी यांचे मोबाईलमध्ये काढलेले अश्लिल फोटो याचा फायदा

घेवुन फिर्यादीस भेटण्यास बोलावुन फिर्यादी हिने नकार दिल्यास ते फोटो व्हायरल करण्याची धमकी देवुन जबरदस्तीने शारिरीक संबध केले तसेच सदर बाबत फिर्यादी ह्या आरोपीत याची पत्नी हिस सर्व हकिगत सांगण्याकरीता दि.16/04/2025 रोजी गेली असता तेथे आरोपीत याची पत्नी यांनी जातीवाचक बोलून तुम्हाला काय करायचे ते करा", त्यावर फिर्यादी हिने आरोपीत याची पत्नी हिस शांतपणे बोलण्याबाबत सांगितल असता आरोपीत क्र.1 म्हणाला की, माइ-या पत्नीशी नीट बोल व तु जे करणार आहे ते कर तुम्ही सर्व खालच्या जातीचे बुरुड आहात असे बोलुन फिर्यादीस जातीवाचक बोलुन अपमानीत केले. सदर गुन्ह्यातील आरोपी दिनांक व वेळ 21/04/2025 रोजी 22:40 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.74/2025 भा.दं.वि.क. 64, 64 (2)(m),, भारतीय साक्ष्य अधिनियम 64,64(2),(m),351(2),3(5),, अनुसुचित जाती जमाती अत्याचर प्रतिबंध अधिनियम 1989 चे कलम 3(1),(r),3(1)(s),3(1),w(i)(ii) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मा.उपविभागीय पोलीस अधिकारी सो.श्री टोम्पे सो.उपविभागीय कार्यालय पेण हे करीत आहेत.

**4.** दादर (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 21/04/2025 रोजी 16:30 वा च्या सुमारास मौजे जिते गावेच हद्दीत सीएनजी पंपाजवळ, जिते, पेण, येथे फिर्यादी रा. एसटी कॉलनी चाळ नं.5 रामवाडी , पेण यांचे एसटी बस समोरून अचानक मारूती व्हॅगनआर कार क्र.एमएच 06 बीयु 6382 ही रस्ता क्रोस करून सीएनजी पंपात गेली त्यामुळे जखमी (साक्षीदार) हे मारूती कार व्हॅगनआर कार मधील आरोपी चालकास जाब विचारण्यास गेले असता त्या गोष्टीचा मनात राग धरून मारूती व्हॅगनआर कारमधील चालक व त्यासोबत असलेल्या 2 ते 3 इसमांनी त्यांना शिवीगाळ करून त्यांचे कानफाटीत मारली तसेच लाथेने मारहाण करून जखमी (साक्षीदार) हे त्यांचे शासकीय कर्तव्य बजावत असताना त्यांना अडथळा निर्माण केला.

याबाबत दादर (सागरी) पोलीस ठाणे गुरनं. 20/2025, भारतीय न्याय संहिता 132,115(2), 352, 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/मनीष म्हात्रे हे करीत आहेत.

**5.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक14/01/2025 रोजी 17:00 वा च्या सुमारास मौजे कर्जत ते कडाव रोडवर दहिवली येथील एच पी पेट्रोलपंपाजवळ सार्वजनिक रोडवर ता.कर्जत येथे जखमी नामे राज संतोष खरमरे, वय 17 वर्षे हे व त्याचा मित्र असे त्यांची मोटार सायकल क्र एम.एच 46 क्यु 0848 ही एच.पी. पेटयेलपंप दहिवली येथुन सालपे गावाकडे जात असतांना आरोपीत चालक रा.पाली, पो.गौळवाडी, ता कर्जत, हा त्याचेकडे वाहन चालवण्याचा परवाना नसतांना त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र एम.एच 46 सी.डब्लु 5389 ही अविचाराने हयगईने बेदरकारपने चालवुन जखमी यांचे मोटार सायकलला ठोकर मारुन त्यांचे पायास किरकोळ व गंभीर स्वरुपाच्या दुखापतीस कारणीभुत झाला आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.108/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम-

125(अ),125(ब)281,324(2) सह मोटारवाहन कायदा कलम 1988 चे कलम 184,182 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/वडते हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 21.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 263 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,58,700/-रुपये इतका दंड आकारला आहे.